दै. लोकमत दि. ०७/०८/२०२२

# रोड्याच्या तयारीतील आरोपी पिस्तूलसह पकडला

लोकमत न्यूज नेटवर्क

ड : दरोडा टाकण्याच्या तयारीत लेल्या पाचपैकी एका आरोपीस डण्यात भाग्यनगर पोलिसांना यश आहे. तर अन्य चार आरोपी मात्र राचा फायदा घेऊन पसार झाले. डलेल्या आरोपीकडून पिस्तुलासह काडतुसे जप्त केली. ही कारवाई नगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक कर आडे यांनी तरोडा भागातील रस्ता परिसरात बुधवारी रात्री .

पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार ळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक श मोरे, उपविभागीय पोलीस कारी चंद्रसेन देशमुख यांच्या दर्शनाखाली शहरात रात्रीची गस्त विण्यात आली आहे. अधिकारीही गस्तीवर राहत असल्याने शस्त्र णारे अनेक जण हाती लागत हेत. भाग्यनगर ठाण्याचे पोलीस क्षक सुधाकर आडे हे गस्तीवर ताना त्यांना पाच जण दरोड्याच्या रीत असल्याची माहिती मिळाली. नी तत्काळ आपल्या कर्मचाऱ्यांसह नगर रस्ता गाठला. यावेळी ड्याच्या तयारीत पाच जण दिसून ले. परंतु, पोलिसांची गाडी पाहता नी अंधाराचा फायदा घेत पळ ढले. तर आरोपी रवी नारायणसिंग कूर (वय ३२) आणि आनंद यादव २३, रा. रवीनगर) या दोघांना लिसांनी पकडण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, रवी ठाकूर याच्या रेला पिस्तूल असल्याने पोलिसांनी त्याला फोकस करत पकडले. परंतु, यावेळी आनंद यादव हा पसार झाला दरम्यान, रवी ठाकूर यांच्याकडून पिस्तूल, जीवंत काडतुसे, मोबाईल आणि दुचाकी जप्त करण्यात आली. आरोपी ठाकूर यास न्यायालयात हजर केले असता त्यास २० जूनपर्यंतची कोठडी सुनावली आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुशांत किनगे हे करीत आहेत.



## आरसीपी जवानांनी घेतल्या नाल्यात उड्या

शिवनगर रस्त्यावर ज्या ठिकाणी आरोपी आढळून आले तिथे बाजूला नाला आहे. पोलिसांना पाहून एका दुचाकीवरून तिघे पसार झाले. तर अन्य दोघांना पोलिसांनी पकडले. परंतु, आरोपी रवि ठाकूर याच्या कंबरेला पिस्तुल होती आणि त्याने नाल्यात उडी घेतली. पिस्तुल पाहून आरसीपी जवानांनी रवि ठाकूरला पकडण्यास फोकस केले. लगेच नाल्यात उड्या घेतल्या. याच संधीचा फायदा घेत आरोपी आनंद यादव पसार झाला. परंतु, आरसीपी जवानांनी नाल्यात उडी घेवून पळण्याच्या तयारीतील आरोपी रवि ठाकूरला पकडले.

---

दै. लोकमत दि. ०१/०७/२२

# पोलिसांनी पकडला गुटख्याचा टेम्पो

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरातील इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुटख्याची वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांनी पकडला. यावेळी टेम्पोसह तीन लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई ३० जून रोजी सायंकाळी करण्यात आली. या प्रकरणात तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

टाटा मॅजिकमध्ये (क्र. एमएच २६ एडी ३०३७) भरून गुटखा हिंगोली जिल्ह्यात नेण्यात येत होता. याची माहिती इतवाराचे पोलीस निरीक्षक भगवान धबडगे यांना मिळाली. त्यानंतर बाफना टी पॉइंट ते देगलूर नाका परिसरात कापूस संशोधन केंद्र परिसरात हा टाटा मॅजिक अडविण्यात आला. या वाहनात ९० हजार रुपयांचा गुटखा आढळून आला. पोलिसांनी हा सर्व गुटखा जप्त केला. या प्रकरणात सहायक पोलीस निरीक्षक राजू सायन्ना मुत्येपोड यांच्या तक्रारीवरून इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. देगलूर नाका परिसरात गुटख्याचे अनेक अड्डे आहेत.

2022